महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा - २०१२

FOO

# 2012

# MARATHI (Compulsory)

101827

# मराठी ( अनिवार्य )

**कालावधी : 3 तास** **एकूण गुण : 100**

---

**सूचना :**

*(i)* *सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

*(ii)* *प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.*

*(iii)* *ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविले आहेत त्या क्रमााने अपेक्षित प्रश्न संख्ये इतक्या प्रश्नांची उत्तरे फक्त तपासली जातील व उर्वरित प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(iv)* *तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.*

*(v)* *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

---

1. पुढीलपैकी **कोणत्याही एका** विषयावर सुमारे 500 शब्दांचा निबंध लिहा : 15

   (a) परीक्षापद्धत बंद केली तर

   (b) मी पक्षी बोलतोय

   (c) विद्यार्थ्यांची आत्महत्या

2. (अ) (i) दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दात अर्ज लिहा. 5

   घरासमोर असलेल्या कचरापेटीची जागा बदलण्याबाबत मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य संचालकास विनंती अर्ज करा.

   (समीर परांजपे पत्र लिहित आहे. मा. आरोग्य संचालक मुंबई महानगरपालिका, मुंबई - 1)

   **किंवा**

   (ii) दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दात विनंतीपत्र लिहा.

   तुमच्या महाविद्यालयातर्फे जिल्ह्यातील खेड्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करावयाचे आहे. त्यासाठीच्या आवश्यक त्या सहकार्यासाठी खेड्याच्या सरपंचांना विनंती करणारे पत्र लिहा. (सदानंद वाडेकर विनंतीपत्र लिहित आहेत. मा. सरपंच, हडशी, ता. मुळशी, जि.पुणे)

(ब) (i) दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दात कार्यक्रमाचा वृत्तांत लिहा. 5

तुमच्या महाविद्यालयात पार पडलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्याचा वृत्तांत लिहा.

**किंवा**

(ii) दिलेल्या माहितीच्या आधारे सुमारे शंभर शब्दात अहवाल लिहा.

तुम्ही राबविलेल्या ग्रामस्वच्छता अभियानाचा अहवाल लिहा.

(क) (i) दिलेल्या माहितीच्या आधारे मुलाखतीच्या वेळी झालेला संवाद सुमारे शंभर शब्दात लिहा. 5

आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकाची मुलाखत शंभर शब्दात लिहा. (शिक्षक : विनय देशपांडे, मुलाखत घेणारे : प्रसाद काळे)

**किंवा**

(ii) दिलेल्या माहितीच्या आधारे पत्रकारपरिषदेचा वृत्तांत प्रश्नोत्तर स्वरूपात शंभर शब्दात लिहा.

पत्रकार परिषदेत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कर्ज माफ करण्याची घोषणा करण्यात आली. त्याचा वृत्तांत शंभर शब्दात लिहा.

3. (अ) दिलेल्या माहितीच्या आधारे 'निमंत्रणपत्रिका' तयार करा. 5

आपटे वाचन मंदीर सांगली यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'इंदिरा संत वाङ्मय पुरस्काराच्या' कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका तयार करा.

(पुरस्कार प्राप्त: डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, हस्ते : प्रा. वसंत आबाजी डहाके, अध्यक्ष : डॉ. विलास खोले)

**किंवा**

तुमच्या गावात बांधलेल्या शाळेचे उद्घाटन मा. शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते होणारे आहे. त्याची कार्यक्रमपत्रिका तयार करा.

(ब) बारावीच्या परीक्षेला बसणाऱ्या तुमच्या मित्राला पाठविण्यासाठी पन्नास शब्दांचे शुभेच्छापत्र तयार करा. 5

(राजेंद्र जोशी, नांदेड याला श्रीकांत जाधव, पुणे येथून पत्र पाठवीत आहे.)

**किंवा**

समाजकल्याण खात्यात अधिकारी म्हणून मित्राची निवड झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

(आनंद पाटील, मुंबई याला पार्थ देसाई, कोल्हापूर येथून पत्र लिहित आहे.)

(क) तुमच्या गावात होणाऱ्या साक्षरता अभियानाच्या माहितीचे आवाहन प्रसार माध्यमांना शंभर शब्दाच्या मजकुराने करा. 5

**किंवा**

वीज दरवाढीच्या निषेधार्थ होणाऱ्या आंदोलनाचे निवेदन प्रसार माध्यमांना सुमारे शंभर शब्दात लिहा.

4. (अ) पुढीलपैकी **एका** विषयावर औपचारिक भाषणाचा मजकूर सुमारे शंभर शब्दात लिहा. 5

(i) भ्रष्टाचार : एक सामाजिक कलंक

(ii) आजच्या शैक्षणिक समस्या

(ब) पुढीलपैकी एका विषयावर माहितीच्या आधारे दोन व्यक्तींमधील संवाद सुमारे शंभर शब्दात लिहा. 5

(i) मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव व विद्यार्थी (परीक्षा घोटाळ्यासंबंधी)

(ii) कुटुंब कल्याण खात्यातील अधिकारी व नागरीक (आर्थिक घोटाळ्यासंबंधी)

(क) पुढीलपैकी एका विषयावर झालेल्या गटचर्चेचा संवादात्मक मजकूर सुमारे शंभर शब्दात लिहा. 5

(i) मराठी माध्यमाच्या शाळांचे प्रश्न

(ii) प्रसारामाध्यमांचे स्वातंत्र्य

5. (अ) पुढील इंग्रजी उताऱ्याचे सरळ, सोप्या मराठीत भाषांतर करा. 5

A man with a small salary is very likely to get into difficulties unless he learns to "budget" for his monthly spending. A fixed amount should be set aside under each heading-rent, food, clothing, insurance, school-fees and so on. The ideal budget would also include a fixed sum, no matter how small to be set apart each month as "saving". Indeed this better be deposited into the Post Office or the Bank, and not kept at home.

(ब) पुढील उताऱ्याचा आशय सरळ, सोप्या भाषेत शंभर शब्दात लिहा. 5

जो ज्ञान देतो तो गुरू. म्हणून आई हा आपला पहिला गुरू. तिनेच या जगात आणून आपल्याला त्याची पहिली ओळख करून दिली. आपल्याला बोलायला शिकविले. वडिलांनी व्यवहारज्ञान आणि नीतिशिक्षण दिले. पण यानंतर ज्ञानाची वेगवेगळी क्षेत्रे आपल्याला दाखवितात, ते आपले लौकिक गुरू. शिक्षक आपल्याला शिकवितात म्हणजे ज्ञानाची माहिती करून देतात. ज्ञानाचा अनुभव जे आणून देतात ते खरे गुरू. या दृष्टीने ग्रंथ हेच आपले खरे गुरू होत. जे कार्य पूर्वी ऋषीमुनी करीत असत, ते ज्ञानानुभव देण्याचे कार्य, ग्रंथ करतात. साऱ्या जगातले नानाविध क्षेत्रांतले ज्ञान, संशोधन, विचार आणि अनुभव ग्रंथामध्ये ग्रथित केलेला असतो. महाकाव्ये, ज्ञानविज्ञानाचे ग्रंथ या सर्वांमधून वेगवेगळ्या प्रकारचे ज्ञान साठविलेले असते. फार काय, कथा-कादंबऱ्यांमधूनही मानवी जीवनाचा अनुभवच प्रकट झालेला असतो. तेही एक प्रकारचे ज्ञानच असते. अनेक क्षेत्रांतील, अनेक प्रकारच्या, अनेक प्रकृतींच्या, अनेक पद्धतींनी जीवनाचा शोध घेणाऱ्या माणसांनी हे ग्रंथ लिहिलेले असतात. त्यांच्या ज्ञानाची विविध रूपे या ग्रंथांत उतरलेली असतात. ती आपल्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारून टाकतात. मग ते रामायण-महाभारतासारखे

(क) पुढील वाक्यांचे काळ ओळखा. 3

(1) विवेक नाटक पाहतो.

(2) त्यांनी भूप राग गायिला.

(3) उद्या परीक्षा संपेल.

(4) पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

(5) महात्मा फुल्यांनी सनातन्यांविरोधात संघर्ष केला.

(6) तू येशील तेव्हा मी घरी असेन.

8. (अ) पुढील वाक्यांचे कंसातील सूचनेप्रमाणे रूपांतर करा. (कोणतेही **सहा**) 3

(1) मनीषा झोपून जागी होईल. (भूतकाळ)

(2) त्यांचा सर्व सन्मान केला जाईल. (वर्तमानकाळ)

(3) मी निबंध लिहिला असेल. (वर्तमान काळ)

(4) पृथ्वी रोज फिरणार (भूतकाळ)

(5) दूरदर्शनवर गाण्याचा कार्यक्रम झाला. (भविष्यकाळ)

(6) मी संध्याकाळी फिरावयास जात होतो. (वर्तमान काळ)

(7) दादासाहेब काव्यवाचन करतात. (भूतकाळ)

(ब) पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही **दोन**) 1

(1) मूग गिळून बसणे (2) गाशा गुंडाळणे

(3) ब्रह्मांड आठवणे

(क) पुढील म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणत्याही **चार**) 2

(1) काळ्या दगडावरील रेघ

(2) दुष्काळात तेरावा महिना

(3) एका माळेचे मणी

(4) अंथरूण पाहून पाय पसरावे

(5) हा सूर्य, हा जयद्रथ

(ड) पुढील इंग्रजी पारिभाषिक शब्दांना पर्यायी मराठी शब्द द्या. 2

(1) Auditor (2) Backlog

(3) Budget (4) Circular

-o0o-

लोकशाही म्हटली की वरवर आपल्याला समाजामधील किंवा राष्ट्रामधील बहुमतवाल्यांचे राज्य, असे वाटते. ही बाह्य किंवा दृश्य परिस्थिती असली, तरी अल्पमतांचेही संरक्षण करणे, ही गोष्ट त्यात अभिप्रेत आहे. एरवी बहुमतवाल्यांच्या शक्तीखाली अल्पमतातील समाज चिरडून जाण्याची शक्यता फार मोठी आहे. सत्तेची विभागणी हा ही लोकशाहीतील महत्त्वाचा घटक आहे. कोणतीही सत्ता एकाच व्यक्तीच्या हातात फार काळ राहता कामा नये. कारण ती व्यक्ती सत्तेचा दुरुपयोग करू शकेल. त्याचबरोबर ती व्यक्ती सत्तेपासून इतरांना वंचितही करण्याचा प्रयत्न करू लागेल. विधिमंडळ, न्यायमंडळ आणि अधिकार मंडळ ह्या तीन मंडळांमधून ही अधिकारविभागणी झालेली असते. एका मंडळाने दुसऱ्या मंडळाच्या अधिकारावर आक्रमण करू नये, ही अपेक्षा असते. मानवाचे जे मूलभूत हक्क आहेत, त्यांच्या जपणुकीसाठी ह्या सर्वांनीच प्रयत्न करावयाचे असतात. कायद्याचे बंधन प्रत्येकाने आपण होऊन पाळावयाचे असते. न्यायालयाची प्रतिष्ठा राखावयाची असते. स्वत: इतकेच दुसऱ्याचेही जीवन सुखी–समाधानी करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावयाचा असतो. असे राजकीय, सामाजिक व व्यक्तिगत जीवन जेथे जगता येते; तेथेच खऱ्या अर्थाने लोकशाही नांदत आहे, असे समजावयास हरकत नाही.

(1) व्यक्तिस्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्मा का मानला जातो ?

(2) सत्तेची विभागणी कशासाठी हवी असते ?

(3) विधी, न्याय व अधिकार ह्या तीन मंडळांकडून अधिकार विभागणी का झालेली असते ?

(4) लोकशाहीचे समाधान कशात आहे ?

(5) उताऱ्यास योग्य शीर्षक सुचवा.

**7.** (अ) पुढील शब्दांच्या जाती ओळखा – **3**

| | | |
|---|---|---|
| (1) उघडले | (2) खारट | (3) कोण |
| (4) पंधरा | (5) आधी | (6) खाली |

(ब) पुढील वाक्यांचे कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यात रूपांतर करा. (**कोणतेही सहा**) **6**

(1) मला ताप आल्यामुळे मी महाविद्यालयात जाणार नाही. (मिश्रवाक्य)

(2) मधूने आधी जेवण केले, कारण त्याला खूप भूक लागली होती. (केवल वाक्य)

(3) दशरथाने आवाज ऐकून बाण सोडला. (संयुक्त वाक्य)

(4) सूर्य उगवताच प्रकाश पडतो. (मिश्रवाक्य)

(5) खूप प्रयत्न करूनही त्याला यश मिळाले नाही. (संयुक्त वाक्य)

(6) सूर्य मावळतो आणि अंधार पडतो. (मिश्र वाक्य)

(7) शरीर निरोगी होण्यासाठी सगळे ध्यानधारणा करतात. (संयुक्त वाक्य)

महाकाव्य असो, 'लीलावती' सारखा गणिताचा किंवा 'गीतारहस्य' सारखा तत्त्वज्ञानाचा ग्रंथ असो, ज्ञानदेवी किंवा तुकारामांची गाथा असो, शेक्सपिअरची नाटके असोत, नाही तर 'अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' असोत. श्रीरामासारखा आदर्श माणूस 'रामायणा'त दिसतो तशी सुष्ट-दुष्ट, स्वार्थी-नि:स्वार्थी माणसांची अनेक रूपे 'महाभारता'तून पाहावयास मिळतात. आदर्श माणसाची, शांती गुणांनी युक्त पुरुषाची लक्षणे ज्ञानदेवीतून वाचावयास मिळतात, तर चातुर्याने यश कसे मिळते, ते 'सुरस गोष्टीं'तून आपणास कळते. ग्रंथांमध्ये केवळ ज्ञानच नसते, तर अनेक प्रकारचा अनुभव साठविलेला असतो. मनाच्या आणि विचारांच्या संपत्तीचे ते भांडारच असते. म्हणून ग्रंथ हे माणसाच्या जीवनाचे शिल्पकार ठरतात. ते नराचा नाराय करतात. असे हे ग्रंथ आपले गुरू असले, तरी आपले सेवक आणि मित्रही बनून राहतात. कपाटात बसून तुमच्या बोलावण्याची ते वाट पाहात असतात. तुम्ही त्यांना स्पर्श करण्याचा अवकाश, की, आपले सारे अंतरंग ते उघडून दाखवितात. जाणती माणसे एखाद्या देशाचे मोठेपण, श्रीमंती ठरवितात ते त्यातील सोने, रत्नहिरेजडित संपत्तीवरून नाही, तर त्या देशात निर्माण झालेल्या ग्रंथांवरून !

6. (अ) पुढील उतारा वाचून त्याचे 1/3 शब्दात सारांशलेखन करा. 5

व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रांत मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर अद्याप का होऊ शकत नाही आणि तो वापर करावयाचा झाल्यास मराठी भाषा ही अर्थव्यवहारात आणि वाणिज्य क्षेत्रात कितपत सुलभतेने वापरता येईल ह्या प्रश्नासंबंधी अजूनही विवेचन करण्याची वेळ आपल्यावर येते. जगात औद्योगिकदृष्ट्या जे समृद्ध आणि प्रगत झालेले देश आहेत त्या देशांमध्ये त्या त्या लोकांची मातृभाषा अभिमानाने आणि सुलभतेने औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रात वापरली जाते. आणि त्यामुळे साहजिकच विश्वविद्यालयीन क्षेत्रात वाणिज्य आणि औद्योगिक विद्याशाखांमधून त्या त्या देशातील मातृभाषेचा सुलभतेने आणि आवर्जून वापर केला जातो. पश्चिम जर्मनी आणि जपान या दोन औद्योगिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या देशांचे ठळक उदाहरण याबाबत घेता येईल. जपानमधील औद्योगिक व्यवहाराची पाहणी करण्याकरिता गेलेल्या एका संशोधकाला तेथील अधिकाऱ्यांशी आणि कामगारांशी इंग्रजीतून बोलणे अशक्य आहे, असे आढळून आले. कारण तेथील बहुतेकांना इंग्रजी फारसे येत नव्हते आणि त्यांचा सर्व व्यवहार जपानी भाषेतून होत होता. हा दाखला देण्याचे कारण इतकेच, की राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत उद्योग आणि व्यापार वाढवायचा असल्यास इंग्रजी भाषेचा वापर अपरिहार्य आहे आणि याउलट मराठी भाषा ही एक अडचण होऊन बसेल अशी जी एक समजूत आहे ती चुकीची आहे.

(ब) दिलेला उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा - 5

लोकशाही ही केवळ राज्यकारभाराची पद्धती नव्हे किंवा समाजपद्धतीही नव्हे, तर लोकशाही ही खऱ्या अर्थाने जीवनातील श्रेष्ठ मूल्यांचे संस्थीकरण आहे. व्यक्तिस्वातंत्र्य हा लोकशाहीचा आत्मा मानला जातो. व्यक्ती ही कधीही कोणाची गुलाम नाही, अंकित नाही. तिच्यावर तिच्या इच्छेविरुद्ध कोणतीही बंधने लादता येणार नाहीत. जात, धर्म, पंथ, पक्ष, रूढी आदींच्या आधाराने कधीही कोणावर जुलूम करता येणार नाही. आचार, विचार, लेखन ह्याबाबतची सर्व स्वातंत्र्ये लोकशाही राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला भोगता आली पाहिजेत. प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या हक्कांइतकीच दुसऱ्याच्या हक्कांची जोपासना केली पाहिजे.